**|| श्री स्वामी समर्थ ||**

---

# || श्री महालक्ष्मि स्तोत्र ||

---

।श्री गणेशाय नमः।
श्री स्वामी सामर्थाय नमः ।

ॐ ऐं ह्रीं क्लीं श्री कनकधारा
फुलोनि जीवन करवी समृद्धीचा फवारा ॥

पद्मावती वैष्णवी वाराही
सुंदर नाम तेरा बहावे सदाही पावन अमीरस का झरा ।

चव चाटोनी प्रसिद्धीची दाविसी सुखाची वाट ।
जाळोनि दुःखदारिद्र्यासी दर्शावे लक्ष्मी आईचा थाट ।

माता जननी अम्बा आई आहे ती विश्व सुंदरी,
वश करोनि सर्व जनाते मोहवी जगात भारी ॥

साऱ्या शत्रूलाही उच्चाटी वाद विवादास काटोनी,
विशालाक्षी होऊनी भयास पीळवी हि वैकुंठवासीनी ॥

विष्णुपत्नी शुभलक्षणा नाशोनी भूत प्रेतादी पीडा ।
हे कवच पठेनी देई संकटासी तिढा ॥

जादू टोनादि निरसोनी घडवी मोह मायेचा संसार ।
निवारोनी कष्टाचा भडीमार तारिसी दुःखमयी सागर ॥

अहोरात्र पठण करोनी या हिरण्मयी कवचाची माला ।
पांघरोनी चादर यश कीर्तीची प्रतिष्ठा देई रत्नमाला ॥

श्री सुंदरी हरी सुंदरी हरीप्रिया जानकी माई ।
खोलोनी भाग्य किवाड फुलवी आरोग्य ती मधुराई ॥

आदी धैर्य,धान्य विजया, विद्या संतती,
धन गज, या आठ भगिनी ।

सुख संपतीस मोहोरूनी भरी भांडार ती विश्व जोगिनी ॥

माया सुंदरी मायावी कनकलक्ष्मी विष्णू भार्या सुखाई ॥

नयनामृता जोगेश्वरी अंबूजा कल्याणी ती स्वामीनी ।
पांघरुनी कवच वशीकरणाचे वश ते करी धनसुंदरी सारे ॥

प्रकृती, विकृती,विद्या, सर्वभूतहीतप्रदा, श्रद्धा ।
विभूती,सुरभी, परमात्मिका, वाचि ती स्वामीनी ॥

मोहोवी विश्वासी करवीर भोगि ती मोहिनी ॥
पद्मालया, पद्मा, शुचि, स्वाहा अन् स्वधा ।

सुधा, धन्या, हिरण्मयी लक्ष्मी ती स्वामीनी ।
स्तंभोनी दुष्टासी सत्व प्रकाशी कनकमाई ॥

नित्यपुष्टा, विभा, आदित्य, दित्य,दीपायै ।
वसुधा,वसुधारिणी,कमलसम्भवा, कान्ता ती स्वामीनी ॥

उच्चाटोनी शत्रूसी कपट लोळवी ती जनमाई ॥
कामाक्षी, क्षिरोद्संभवा, अनुग्रहप्रदा, बुद्धी, अनघा ।

हरिवल्लभी,अशोका, अमृता, दीप्ता ती स्वामीनी ।
दूर करवी शत्रुबुद्धीसी महामाया ती व त्रिपुरा सुंदरी ॥

लोकशोकविनाशी,धर्मनिलया,करुणा, लोकमात्री, पद्मप्रिया ।

पद्महस्ता , पद्माक्ष्या, पद्मसुन्दरी, पद्मोद्भवा ती स्वामीनी ॥

मारोनी दुष्ट शत्रूसी सुखास फुलवी ती पद्मावती ॥

पद्ममुखी, पद्मनाभप्रिया, रमा,पद्ममालाधरा, देवी ।
पद्मिनी,पद्मगन्धिनी, पुण्यगंधा,सुप्रसन्ना ती स्वामीनी ।

ऋणास फेडोनी दावी सुखाचा मेरू ती धनलक्ष्मी ॥

प्रसादाभिमुखी, प्रभा, चंद्रमाली, चंद्रावंदना, चन्द्रा ।
चन्द्रसहोदरी,चतुर्भुजा,चन्द्ररूपा,इन्दिरा ती स्वामीनी ॥

मालोनि दारिद्र्याचा फेरा सुखास फुलवी हिरन्याक्षी ॥

इंदुशीतला, आल्हादजननी, पुष्टी, शिवा,शिवकरी ।
सत्या, विमला,विश्वजननी, तुष्टी ती स्वामीनी ।
कोपतापास विटोंबोनी आनंदी करवी कुलारंभी ॥

दारिद्र्यनाशिनी, प्रितिपुष्करिणी, शान्ता, शुक्लमाल्यांबरा, श्री ।
भास्करी, बिल्वनिलया, वरारोहा यशस्विनी ती स्वामीनी ॥

नवसास पुरवी सत्य ती माई सत्यवती ॥
वसुंधरा, उदारांगा,हरिणी, हेममालिनी,
धनधान्यकी,सिद्धी, स्त्रैणसौम्या,शुभप्रदा,
कुलोद्भव ती स्वामीनी ।

दावी प्रतिष्टेचा मेरू लाड पुरवी कुलसुंदरी ॥
वरलक्ष्मी, वसुप्रदा, शुभा, हिरण्यप्रकाशा,
समुद्रतनया जया , मंगलादेवी विष्णवक्षस्थलवासिनी
कुलसंभवा ती स्वामीनी ॥
रोग मृत्यूचा फेरा मोडी ,

जीवन देई ती जगद्धाजी प्रसन्नाक्षी,
नारायणसमाश्रि दारिद्रयध्वंसिनी,
अमृता, उपद्रव वारिणी।
नवदुर्गा,महाकाली, दुर्गतीहरिनी, ब्रह्
माविष्णुशिवात्मिका ती स्वामीनी ॥
संकटास शमवोनि शुभारंभी ती कुलवासीनी ॥

कुलस्वामिनी,कुलजननी, कुलधात्री,
कुलपोषकी, कुलमाता।
कुलमाई, कुलजन्मदात्री, कुलरंजकी,
कुलसंज्ञकी ती स्वामीनी ॥

कुळदोष नाशकरी सत्य ती कुलसंचारी।
श्रीमुखा, श्रीवदना, श्रीवर्धनी,श्रीधात्री, श्रीजननी।
श्रीकर्ती, श्रीधर्ती, श्रीवासा, श्रीसमुद्भवा, ती स्वामीनी।
संकल्प पुरवोनि वास करिसी श्री भंडारवासिनी ॥

धारण करोनि भुवनेश्वरी कवचाचा
विडा शमवोनि साडेसाती,
राहू केतू आदी दुष्ट ग्रहांची पीडा।

विदयार्थ्यास देई विद्या।
धनार्थ्यास धन देई।
गर्भिणीस सुख देई

वंधेस देई पुत्र ॥

ॐ करीवास प्रज्ञापुरी ब्रह्म
तो ब्रम्हपुरी विष्णू निवासी
वैकुंठी शंभो राही कैलासपुरी ।
वंदोनि लक्ष्मी मातेसी सदा
वास करी माझिया घरी ॥
।। इती श्री महालक्ष्मि स्तोत्र समाप्तः ।।

॥ श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥
|| श्री स्वामी समर्थापर्ण मस्तु||